दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १९४ वा | शुक्रवार, दि. ०७ मार्च २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना:- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

## वैराग येथील संतनाथ साखर कारखान्याला भीषण आग



**वैराग (कटूसत्य वृत्त):-** वैरागमधील तुळशीदास नगर येथील भोगावती तथा संतनाथ सहकारी साखर कारखान्याला आज (दि. ६) भीषण आग लागली. यात लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झालेली नाही. मागील कित्येक वर्षांपासून कारखान्यावर प्रशासक आहे. मागील २० वर्षांपासून कारखाना बंद अवस्थेत होता. कारखाना स्थळावरील लाखो रुपये किमंतीचे भंगार, मशिनरी, पार्ट चोरीला गेले आहेत. कारखाना परिसरात काटेरी झुडपे, गवत वाढल्याने भंगार चोरण्यासाठी चोरट्यांना अडथळा निर्माण होत होता. त्यामुळेच भंगार चोरांनीच ही आग लावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## स्वाधार योजनेसाठी अर्ज भरण्यास 15 मार्च पर्यंत मुदतवाढ

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. या योजनेसाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज सादर करावयाचे असून अर्ज भरण्याकरिता दि. 15 मार्च 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. सदर योजनेची व्याप्ती तालुकास्तरापर्यंत वाढविण्यात आलेली असून विद्यार्थ्यांचे उशिरा सुरु होणारे शैक्षणिक सत्र व विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी आदी कारणामुळे विविध विद्यार्थी संघटना, पालक, विद्यार्थी यांचेकडून स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली आहे. याबाबत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी पोर्टल वर अर्ज भरण्यासाठी दि. 15 मार्च 2025 पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

# औरंगजेबाला मदत करणारे अनाजी पंत याही जमान्यात

## राजद्रोहाचा गुन्हा दाखल करा! भैय्याजी जोशीच्या विधानाचा उद्धव ठाकरे यांनी घेतला समाचार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांच्या वक्तव्याचा खरपूस समचार घेतला. उद्धव ठाकरे यांनी विधानभवनमध्ये माध्यमांशी संवाद साधला.

औरंगजेबला मदत करणारे अनाजी पंत याही जमान्यात जन्माला आलेत. याच्या सारखं दुसरं दुर्दैव असू शकत नाही, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला. मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी शिकले पाहिजे असे नाही, अशी मुक्ताफळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांनी उधळली. त्यावरून उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची चांगलीच खरडपट्टी काढली. अशी भाषा त्यांनी अहमदाबादमध्ये करून दाखवावी, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिले.

महायुतीच्या सर्व आमदारांना खास छावा चित्रपटाचा शो आयोजित केलेला. ही कल्पना ज्यानी मांडली त्यांचं मी काल जाहीर अभिनंदन केलं. दुदैर्वाने सगळी लोकं त्याच्यात गद्दार लोकं गेलेच नव्हते. पण ही सगळी लोकं छावा चित्रपट बघताना या काळातले अनाजी पंत हे इकडे येऊन मराठी-अमराठी असं विष कालवून गेले. दुदैर्वाने असं झालेलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुन्हा जन्माला येऊ शकत नाहीत. छत्रपती संभाजी महाराज पुन्हा जन्माला येऊ शकत नाहीत. पण महाराष्ट्रामध्ये फूट पाडणारे औरंगजेब आणि औरंगजेबला मदत करणारे अनाजी पंत मात्र, याही जमान्यात जन्माला आलेत, येताहेत. याच्या सारखं दुसरं दुर्दैव असू शकत नाही, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला.

अशी काही लोकं आपल्या देशात आहेत की जणू काही ब्रह्मदेवाला आम्हीच जन्म दिला. आणि जगभर ब्रह्मज्ञान सांगत फिरतात. त्यातलेच काल अनाजी पंत, आता त्यांची मातृभाषा कोणती याची कल्पना नाही. पण त्यांनी येऊन मुंबईमध्ये घाटकोपरला मुंबईमध्ये राहणाऱ्याला मराठी आलीच पाहिजे, अशी काही गरज नाही, असं एक द्वेषाचं गोमुत्र म्हणायचं की काय? पण शिंपडून गेले. याचा अर्थ असा हा संघाचा छुपा अजेंडा आहे, भाजपचा छुपा अजेंडा आहे. यांचे दाखवायचे दात आणि खायचे दात हे वेगळे आहेत, असा हल्ला उद्धव ठाकरे यांनी चढवला.

बऱ्याच दिवसांत हिंदुस्थान-पाकिस्तान हा विषय त्यांनी काढलेला नाही. मग काय, बटेंगे तो कटेंगे. आता बटेंगे तो कटेंगे म्हणजे केवळ हिंदू-मुसलमान नाही. तर मराठी-अमराठी, मराठीमध्ये पुन्हा मराठा-मराठेतर असं सगळं वाटणी करायची आणि आपण राज्य बळकवायचं. हे जे कोणी अनाजी पंत आले होते, त्यांना आव्हान देतो की, अशी भाषा त्यांनी अहमदाबादमध्ये करून दाखवावी. तामिळनाडूमध्ये करून दाखवावी. कर्नाटकात, केरळमध्ये, पश्चिम बंगालमध्ये ही तिकडे भाषा करून दाखवावी. फक्त भाषा करून दाखवायची नाही तर भाषा करून सुखरूप येऊन दाखवावं. मराठी माणूस हा सहृदयी आहे. दयाशील आहे म्हणून कोणीही यावं टपली मारून जावं, अशी आताही पद्धत आहे. आणि यातून मराठी माणूस हा भाजप किंवा संघ खिजगणतीत धरत नाही. आम्हाला मराठी माणूस मतं देणारच आहे, जातोय कुठे? असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आणि भाजपला सणसणीत टोला लगावला.





**भय्याजी जोशी काय म्हणाले होते?**

'मुंबईची कुठलीही एक भाषा नाही, मुंबईच्या अनेक भाषा आहेत. वेगवेगळ्या भागात वेगवेगळी भाषा असते. जशी घाटकोपर परिसराची भाषा गुजराती आहे. त्याचप्रमाणे तुम्हाला गिरगावात हिंदी बोलणारे कमी सापडतील. तिथे तुम्हाला मराठी भाषा बोलणारे लोक दिसतील. मुंबईत येणाऱ्या व्यक्तीने मराठी शिकलं पाहिजे असं काही नाही', असे विधान मुंबतील विद्याविहार येथे भाषण करताना भय्याजी जोशी यांनी केले होते.

भाषावार प्रांत रचना देशाची झाली. आता ही मुंबईची भाषावार गल्ली रचना करताय की काय? आणि मग तोडा फोडा आणि राज्य करा, ही अत्यंत घाणेरडी आणि विकृत मानसिकता या निमित्ताने सगळ्यांसमोर आली आहे. काल ज्या प्रमाणे मुख्यमंत्री विधानपरिषदेत बोलले की, कोरटकर कोरटकर काय करताहेत, कोरटकर हा चिल्लर माणूस आहे. तसं मुख्यमंत्र्यांनी जाहीर करायचं भय्याजी भय्याजी काय करताहेत, भय्याजी जोशी हा चिल्लर माणूस आहे. एकतर त्यांनी तो चिल्लर म्हणून जाहीर करावं नाहीतर त्या चिल्लरचा बंदा रुपया असतो त्याच्यावरती राजद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. कारण महाराष्ट्रात मराठी भाषा सक्तीची करण्याचा कायदा हे महाविकास आघाडीचं सरकार असताना मी मुख्यमंत्री असताना केलेला आहे. या कायद्याच्या विरोधात इकडे मराठी भाषा आली नाही तरी चालेल असं बोलण्याचं धाडस करणाऱ्या एकावरती जर का कायद्याचा बडगा उगारला तर यापुढे असं कोणाची बोलण्याची हिंमत होणार नाही. आणि नाहीतर मग त्यांनी सांगावं की संघाचा आणि भाजपचा छुपा अजेंडा आहे. एक तर कारवाई करावी नाहीतर हे काय पाप आहे हे त्यांनी मान्य करावं, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## वर्षानुवर्षे सोलापूरच्या समस्या का सुटत नाहीत, तीव्र लाक्षणिक उपोषणाचा निर्णय

### ११ मार्च रोजी जिल्हा परिषदेपुढे उपोषण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या दीर्घकाळ प्रलंबित आणि तातडीने मार्गी लावाव्या लागणाऱ्या विकासकामांवर चर्चा करण्यासाठी सोलापूर विकास मंचच्या वतीने शासकीय विश्रामगृहात विशेष बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत शहराच्या विस्कळीत, दुषित आणि अनियमित पाणीपुरवठा, दुहेरी जलवाहिनी, स्मार्ट सिटी प्रकल्प,शहर पाणीपुरवठा सुधारणा साठी नगरोथ्थान योजनेतुन ८० कोटी रुपए मिळाले, त्या पैशातुन नेमक्या काय काय सुधारणा झाल्या?, आय.टी. पार्क, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आदी विषयांवर व्यापक चर्चा झाली.

बैठकीत पुढील महत्त्वाच्या मुद्द्यांवर सरकारच्या निष्क्रियतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली-

१. दोवोसमधून सोलापूरला एकही रुपयांची गुंतवणूक मिळाली नाही.
२. सोलापूर विमानसेवा अद्यापही सुरू नाही.
३. दुहेरी जलवाहिनी प्रकल्प रखडला.
४. शहरातील दोन उड्डाणपूल अद्याप अपूर्ण
५. एम.आय.डी.सी.तील विविध समस्या प्रलंबित.
६. छत्रपती संभाजी महाराज चौक ते सीएनएस हॉस्पिटल ५४ मीटर रस्ता रखडलेला.
७. नवीन डी.पी. प्लॅनविषयी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी.
८. जुळे सोलापूर प्राधिकरण अस्तित्वात येणे अत्यावश्यक.
९. शहर परिवहन विभागासाठी नवीन बसेस आणि सुधारणा गरजेची.
१०. सोलापूरातील तरुणांमध्ये वाढत चाललेला मावा, मटका, मिरवणूक, डी. जे. डॉल्बी आणि लेझरचा विळखा.
११. सोलापूरातील आय.टी. उद्योजकांसाठी विशेष तरतुदी आणि आय.टी. पार्कची स्थापना.
१२. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी मंजुरी मिळाली असली तरी प्रत्यक्ष सत्र सुरू नाही.

सोलापूर विकास मंचच्या वतीने या विषयांवर वेळोवेळी 'आपले सरकार' पोर्टलवर तसेच मंत्र्यांना, खासदारांना आणि आमदारांना निवेदने देऊन कैफियत मांडण्यात आली आहे. मात्र, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून कुठलीही ठोस कार्यवाही होत नसल्याने आता तीव्र आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार दिनांक ११ मार्च २०२५ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सोलापूर जिल्हा परिषदेच्या पुनम गेटसमोर तीव्र लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.

सोलापूरच्या विकासासाठी दिलेला हा लढा आणखी तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. प्रशासनाच्या दुलक्षार्मुळे शहराचा विकास खुंटत चालला असून, नागरिकांनीही यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मंचच्या वतीने करण्यात आले आहे. ह्या बैठकीस सोलापूर विकास मंचचे केतन शहा, मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, विजय कुंदन जाधव, ॲड. दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर, सुहास भोसले, आनंद पाटील, अर्जुन रामगिर, भारत पाटील, निरज मेहता, माऊली झांबरे, डॉ.सुरेश खमितकर, बाळासाहेब मोरे, रेवण आयगोळे, सुर्यकांत पारेकर, योगेश सलगर आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.

## विविध मागण्यांसाठी सर्व संघटनांची वज्रमुठ

### जिल्हा परिषद गेटवर धरणे आंदोलन, घोषणांनी परिसर दणाणला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विविध मागण्यांसाठी सर्व संघटनांची वज्रमुठ करून शासनाचे लक्ष वेधले. जिल्हा परिषद गेटवर धरणे आंदोलन, घोषणांनी परिसर दणाणून गेला. हजारो कर्मचारी या आंदोलना मध्ये सहभागी झाले होते.

जिल्हा परिषद मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे वतीने एकत्रित सर्व संघटना एकत्रित करून सत्याग्रह धरणे आंदोलन दोन तास सुरू होते. रणरणत्या उन्हात १७ मागण्यांसाठी कर्मचारी एकजुटले होते. या प्रसंगी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष शंतनु गायकवाड यांनी घोषणा देत कर्मचारी यांचे मध्ये दोष वाढविला. शिक्षक नेते सुरेश पवार, कामगार नेते अशोक जानराव,



अविनाश गोडसे, जिल्हा परिषद कर्मचारी युनियन चे डॉ. एस पी माने, महासंघाचे अध्यक्ष दिनेश बनसोडे यांची प्रमुख भाषणे झाली.

**राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना शाखा सोलापूर व समन्वय समितीचे यशस्वी धरणे आंदोलन**

लोकशाही पद्धतीने केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन प्रलंबित मागण्यांबाबत त्वरित निर्णय घ्यावा अशी मागणी केली. या मागण्यांबाबत यापुढेही दिरंगाई होत राहिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. जुनी पेन्शन योजना लागू करा, कंत्राटीकरण रद्द करा, कायम नोकर भरती चालू करा, वाहन चालक व शिपाई पदाची भरती सुरू करा, विनाअट अनुकंपा नोकर भरती सुरू करा, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या वारसांना विनाअट सेवेत सामावून घ्या, हम सब एक है हमारी युनियन हमारी ताकद या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

राज्य सरकारी कर्मचारी संघटना व जिल्हा समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मा. जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन दिले.

या धरणे आंदोलनात राज्य सरकारी चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना सोलापूर महाराष्ट्र राज्य कंत्राटी कर्मचारी संघटना सोलापूर, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना कृती समिती, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ सोलापूर, जिल्हा

(पान 2 वर..)

## सिव्हील हॉस्पिटल येथे बोगस रक्त चाचण्या करणाऱ्या लॅबची चौकशी करा

### अन्यथा संत रोहिदास सामाजिक संघटना आझाद मैदान येथे उपोषण करणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर अंतर्गत श्री महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेमध्ये डॉक्टरांच्या आदेशान्वये विविध रुक्त चाचण्या प्रक्रियेमध्ये दि ०१/०४/२०२२ ते दि १६/०९/२०२४ या काळातील रक्त चाचण्याचे



बोगस बिले काढल्याने दि ०१/०४/२०२२ ते १६/०९/२०२४ या काळातील जे रक्त चाचण्या लॅबधारक श्री साई डायग्नोस्टिक चे प्रो. प्रा. सोमनाथ स्वामी, प्रकाश हंजगे व डॉ. शैलेश पटणे इत्यादींची चौकशी करण्यात यावी अशी मागणी संत रोहिदास सामाजिक संघटनेच्यावतीने (पान 2 वर..)

## सोलापूरात ऑपरेशन टायगर, ठाकरेंच्या शिवसेनेला भगदाड, बड्या नेत्यांचा जय महाराष्ट्र

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरे गटाला शिंदे गटाकडून जोरदार धक्के दिले जात आहे. आता सोलापूर जिल्ह्यात ठाकरे गटाला मोठे भगदाड पडणार आहे. ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख तथा माजी जि.प. तथा सदस्य अमर पाटील हे गुरुवारी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, माजी आमदार शिवशरण पाटील,माजी आमदार रतीकांत पाटील हे माजी आमदार शिंदे गटाच्या वाटेवर आहेत अशी खात्रीलायक माहिती समोर आली आहे. एकंदरीत पाहता सोलापूरच्या ठाकरे सेनेमध्ये शिंदे गटाने ऑपरेशन टायगर चालवण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.विधानसभा निवडणूक झाल्यानंतर जिल्हाप्रमुख अमर पाटील हे ठाकरे सेनेत नाराज होते. पक्षाचे



संपर्कप्रमुख अनिल कोकीळ हे संपूर्ण निवडणुकीदरम्यान दक्षिण सोलापूर मतदारसंघात फिरकले नाहीत, त्यांनी काही सहकार्य केले नाही, असा आरोप अमर पाटील समर्थकांनी करत त्यांनी आयोजित केलेल्या बैठकीत गोंधळ केला होता.

**राजीनामा की हकालपट्टी?**


ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी बुधवारी संध्याकाळी ६ वाजता पदाचा व प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. यानंतर अर्ध्या तासातच अमर पाटील व माजी राज्यमंत्री उत्तम प्रकाश खंदारे यांनी पक्षविरोधी कारवाया केल्याचा आरोप करत दोघांची हकालपट्टी केल्याचे पत्र शिवसेनेचे (उबाठा) सचिव विनायक राऊत यांनी काढले.त्यामुळे अमर पाटील आणि उत्तम प्रकाश खंदारे यांची हकालपट्टी केली का, यांनी स्वतः राजीनामा दिला याबाबत संभ्रम कायम आहे.

**ठाकरे सेनेचे जिल्हा प्रमुख दोन माजी आमदार शिंदेसेनेत**

अमर पाटील याना नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ४० हजारांच्या आसपास मते मिळाली होती. अमर पाटील यांच्यामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यात शिंदे गटाची ताकद वाढणार आहे. दरम्यान, या तीन मोठ्या नेत्यांच्या जाण्याने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला धक्का बसणार आहे. ठाकरे गटाचे नेते सोडून गेल्याने आता ठाकरे सेनची धुरा कोण सांभाळणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. विधानसभेच्या वेळी मविआमध्येही काही आलबेल नसल्याचे चित्र दिसले होते. त्यामुळे ठाकरे गटाला सोलापूर हा सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे.

## उजनी धरणातून शेतीसाठी सलग ८० दिवस पाणी! धरणाचे पाच दरवाजे उघडले जाणार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मुंबईत पार पडलेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत उजनी धरणातून सोलापूर जिल्ह्यातील शेतीसाठी सलग दोन आवर्तने सोडण्याचा निर्णय झाला आहे. ६ मार्च ते १५ एप्रिल असे पहिले आवर्तन तर १५ एप्रिलपासून २५ मेपर्यंत दुसरे आवर्तन सोडले जाणार आहे. गुरुवारी शेतीसाठी पाणी सोडण्याकरिता



धरणाचे पाच दरवाजे उघडले जाणार आहेत. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून शेतीपिकांनाही पाण्याची ओढ बसू लागली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी उजनीतून पाणी सोडण्याची मागणी केली होती. उजनी धरणात सध्या एकूण पाणीसाठा ८९.९० टीएमसीपर्यंत असून त्यात २६.१५ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा (४८.८४ टक्के) आहे. उजनी धरणातील पाणीपातळी उणे २० टक्के झाल्यावर शेतीसाठी कॅनॉलमधून पाणी सोडता येत नाही. त्यामुळे शेतीसाठी दोन आवर्तने सलग सोडण्याचा निर्णय मुंबईत झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. पावसाळ्यापूर्वी सोडणाऱ्या आवर्तनामुळे ३० जून रोजी धरण उणे ३९.५२ टक्के होईल, असा अंदाज आहे. दरम्यान, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.

## बनावट आधार कार्डद्वारे सोलापुरात राहणाऱ्या 12 बांगलादेशी नागरिकांना अटक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बनावट आधार कार्डचा वापर करुन सोलापुरात राहणाऱ्या 12 बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी अटककेली आहे. सोलापुरातील एमआयडीसी परिसरातील एका गारमेंट कारखान्यात हे सर्वजन कामगार म्हणून कामाला होते.



सोलापूर शहर पोलिसांना या बाबतीत गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी या सर्व बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेत चौकशी केली आहे. यावेळी त्यांच्याकडे बनावट आधार कार्ड असल्याचे पोलिसांना आढळून आले आहे. (पान 2 वर..)

## संपादकीय

# माहितीची असुरक्षितता

आधुनिक काळामध्ये सर्व प्रकारची प्रसारमाध्यमे सर्वांना खुली झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर माहिती मिळत असतानाच या माहितीबाबत असुरक्षिततेची वाढती चिंताही भारतीय जनमानसात वाढत चालली आहे. लोकल सर्कल या संस्थेने केलेल्या संशोधनाप्रमाणे भारतातील 87 टक्के लोकांना त्यांची गोपनीय वैयक्तिक माहिती सुरक्षित नाही अशी भीती वाटत आहे. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये अशाप्रकारची भीती वाटणार्या नागरिकांचे प्रमाण वाढत चालल्याचेही दिसून येते. कोणत्याही भारतीय नागरिकांसाठी जी मूलभूत कागदपत्रे आहेत त्यामध्ये पॅन आणि आधार कार्ड यांचा समावेश होतो. पण या कार्डाशी संबंधित असलेली माहितीच गोपनीय राहात नाही अशा प्रकारची भीती आता सर्वसामान्य नागरिकांना वाटत आहे.

एकीकडे अशा प्रकारची माहिती गोपनीय ठेवण्यासाठी डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीचा विषय सुरू असतानाच जर देशातील बहुतांश नागरिकांना त्यांची गोपनीय माहिती सुरक्षित नसल्याची भावना वाटत असेल तर त्याचा गंभीर विचार आता सरकारलाही करावा लागणार आहे. 1991 नंतर भारतामध्ये जे नवे आर्थिक युग सुरू झाले त्यामध्ये खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीची अंमलबजावणी सुरू झाली. जागतिक पातळीवर काम करणार्या अनेक कंपन्या भारतातही कार्यरत होऊ लागल्या. त्यानंतर गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्यानंतर डिजिटल माध्यमातूनच सर्व व्यवहार होत आहेत.

या परिस्थितीमध्ये जरी देशात सध्या खासगीकरणाचा बोलबाला असला तरी सर्वसामान्य नागरिकांची खासगी माहिती मात्र आता खासगी राहिलेली नाही असेच अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. ज्या प्रकारे कोणत्याही नागरिकाला दिवसातून अनेक अनोळखी फोन येतात, ज्यामध्ये फोन करणारी व्यक्ती विमा विकत असते किंवा बँकेचे कर्ज विकत असते किंवा इतर काही गोष्टींबाबत माहिती सांगत असते त्या अर्थी या प्रकारे विशिष्ट नागरिकांनाच अशा प्रकारे विम्यासाठी, बँकेच्या कर्जासाठी किंवा इतर काही गोष्टींसाठी फोन केले जातात. याचा अर्थ त्या व्यक्तींची माहिती संबंधित फोन करणाऱ्यांना मिळालेली असते.

सरकारी पातळीवरील यंत्रणा, दूरसंचार कंपन्या, बँका, ई-कॉमर्स कंपन्या किंवा विविध वेबसाइटसुद्धा आपापल्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी किंवा काही माहिती देण्यासाठी अशाप्रकारे गोपनीय माहिती कुठून तरी मिळवतात आणि संबंधित व्यक्तींना फोन करून आपला फायदा कसा होईल हे बघत असतात. जेव्हा जेव्हा पॅन किंवा आधार यासारखे मूलभूत कागदपत्रं एखाद्या व्यवहारासाठी सादर केले जातात तेव्हा या कागदपत्रांशी संबंधित मूलभूत माहिती लिक केली जाणार नाही अशा प्रकारची ग्वाही संबंधित संस्थेकडून दिली जात असते. पण प्रत्यक्षात तसे होत नाही.

गेल्या काही वर्षांमध्ये स्पॅम प्रकारातील फोनचे प्रमाण वाढले आहे आणि डिजिटल अरेस्टसारख्या नवीन फसवणुकीच्या माध्यमातून सामान्य नागरिकांची सुरक्षितता धोक्यात येत आहे. ते पाहता केवळ जी माहिती संबंधित व्यक्तीपुरती मर्यादित राहायला हवी ती माहिती तशी मर्यादित न राहता इतरांनासुद्धा उपलब्ध होत असल्याचीच बाब समोर येत आहे. ज्या संस्था किंवा कंपन्या यांचा दैनंदिन हजारो किंवा लाखो ग्राहकांशी संबंध येतो त्यांच्याकडे या सर्व ग्राहकांची माहिती असते. अनेक वेळा या प्रकारची माहिती इतर कंपन्यांना शेअर केली जाते. या कंपन्या या माहितीचा कसा उपयोग करणार आहेत याची कोणतीच कल्पना अशा प्रकारे माहिती देणार्यांना नसते. त्यामुळे या माहितीचा दुरुपयोगसुद्धा होऊ शकतो.

एकीकडे आरबीआयसारख्या सर्व संस्था सातत्याने पॅन आणि आधारबाबतची गोपनीय माहिती अजिबात उघड करू नका अशा प्रकारची जाहिरातबाजी करत असताना दुसरीकडे ज्या संस्थांकडे किंवा कंपन्यांकडे आपली ही गोपनीय माहिती आहे त्या संस्थाच जर अशा प्रकारे माहिती दुसर्यांना देत असतील तर या सर्व गोष्टींवर नियंत्रण कसे ठेवायचे हाच सर्वात मोठा प्रश्न आहे. सरकारने जो डेटा प्रोटेक्शन संदर्भात नवीन कायदा आणण्याचा विचार केला आहे त्यामध्ये कोणती माहिती इतरांना देता येऊ शकते याबाबत काही नियम केले जाणार आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये भारतात जी डिजिटल प्रशासन यंत्रणा कार्यरत झाली आहे त्याचा विचार करता भारतीयांचे सर्व व्यवहार पॅन आणि आधारशी लिंक असल्याने सर्व माहिती आपोआपच उपलब्ध होऊ शकते.

बँकिंग किंवा इन्शुरन्स व्यवहार करणार्या संस्थांकडे आपल्या ग्राहकांची अशा प्रकारची सर्व गोपनीय माहिती असते. आपले भविष्यातील ग्राहक कोण असतील हे समजून घेण्यासाठी इतर कंपन्यांनी बँकिंग किंवा इन्शुरन्स कंपन्यांकडून अशा प्रकारची माहिती घेतली जाते. तर डिजिटल व्यासपीठाचा गैरवापर करून भ्रष्टाचार करणारे जे समाजकंटक आहेत ते मात्र अशा प्रकारच्या माहितीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना लुटतात हे गेल्या काही दिवसांमध्ये सिद्ध झाले आहे.

सर्वसामान्य नागरिकांना सरकारी कार्यालयात कमीत कमी हेलपाटे मारावे लागावीत आणि घरबसल्या त्यांची सर्व कामे व्हावी या एकाच हेतूने सरकारने पॅन आणि आधार कार्डाच्या माध्यमातून जरी सर्व आर्थिक यंत्रणा कार्यरत केल्या असल्या तरी या डिजिटल कार्यपद्धतीच्या माध्यमातून महत्त्वाच्या माहितीची गळती होण्याचा जो गंभीर प्रकार वाढत चालला आहे तेसुद्धा महत्त्वाचे मानावे लागेल. देशातील 87 टक्क्यांपेक्षा जास्त लोकांना आपली वैयक्तिक माहिती असुरक्षित आहे असे वाटत असेल, तर सरकारला आता तातडीने गोपनीय माहितीला संरक्षण देणारा कायदा संमत करून घेऊन अमलात आणावा लागणार आहे.

प्रबोधन

# आरत्या भूपाळ्या । भाकरी न देती

आकाशवाणी हा शब्द देवांच्या बरोबरच जन्मला असावा. कारण त्याचा पूवीर्चा अर्थ, स्वर्गस्थ देवांनी केलेली आज्ञा असा आहे. आकाशवाणी शब्दाचा त्यानंतर रेडिओ केंद्रासाठी वापर होऊ लागला. नभोवाणी असाही एक समानार्थी शब्द वापरला जाई. पण आकाशवाणीइतका तो लोकप्रिय झाला नाही. पण आकाशवाणी शब्द पूवीर्चा असो वा त्यानंतरचा असो, त्याच्यावरील देवी-देवतांचं वर्चस्व पूर्वी जेवढं भक्कम होतं, तेवढंच आजही भक्कम आहे आणि उत्तरोत्तर ते अधिक भक्कम होत चाललं आहे. आज आकाशवाणीचा नवा अवतार दूरदर्शन नावाने ओळखला जात असला, तरी त्याची जनुकीय रचनाही आकाशवाणीतूनच विकसित झाली आहे. सकाळी रेडिओ लावा किंवा दूरदर्शन पाहा. त्यांनी प्रभाते मनी राम चिंतित जावा हा रामदासोक्त आदेश धर्माज्ञा समजून बिनचूक पाळल्याचं आढळून येईल. भारताच्या राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेचं तत्त्व आहे, हे दुर्लक्षून धार्मिकता वाढवण्याचा पद्धतशीर प्रयत्न राष्ट्रघातकी प्रसारमाध्यमं - तीदेखील सरकारी- अगदी मनापासून करताना आढळतात.

धार्मिकतेने जगाचं नुकसान होतच आहे, हे सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट असून धर्मिष्ठपणा आणि भ्रमिष्ठपणा यात फरक राहिलेला नाही. म्हणूनच विचारवंत प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'धर्म या नावाच्या वृक्षाला नव्याने मोहोर येत नसेल आणि धर्मयुद्ध नावाची कीड लागणार असेल, तर हा वृक्ष समूळ काढला पाहिजे.'

आकाशवाणी आणि दूरदर्शन भल्या पहाटेपासून स्तोत्रं, भूपाळ्या, आरत्या, स्तवनं आणि भक्तिगीतांचा रतीब प्रामाणिक कुटिलपणे रोज घालत आहेत आणि पुढेही घालीत राहाणार आहेत. देवी-देवतांचा वाराशी मेळ घातला जातो. रविवारी सूयार्ची स्तवनं पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव वाजतात. सोमवारी जय शंकरा, गंगाधरा किंवा पुढे उभा मंगेश, मागे उभा मंगेश ऐकवलं जातं. मंगळवार-शुक्रवार अंबा, भवानी, दुगेर्चे माझी माय अंबाबाई साऱ्या दुनियेची आई किंवा उदे गं अंबे उदे बुधवारी विठू माझा लेकुरवाळा किंवा विठ्ठल तो आला आला, विठू माऊली ही माऊली जगाची, गुरुवारी दत्ता दिगंबरा या हो किंवा दत्त दरसेनाला जायाचं जायाचं अशा इच्छा व्यक्त होऊ लागतात, शनिवारी मारुतीची स्तुती अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान अशा शब्दांत केली जाते आणि गणपती तर सुपरहीरो! संकष्टी, विनायक चतुर्थी आणि अलीकडे गणेश जयंतीची टूम निघाल्यामुळे त्या दिवशी गणराज रंगी नाचतोपासून अष्टविनायका तुझा महिमा कसा ऐकवून अक्षरशः कानाचे पडदे फाडून टाकले जातात. खासगी दूरचित्रवाणी चॅनलवाले तर देशाच्या सर्व मंदिरातील भक्तजनांच्या आरत्यांचं जिवंत चित्रप्रसारण करून अमाप पुण्य आणि पैसा कमावण्याच्या उद्योगात गढून गेलेले असतात. पण सरकारी प्रसारमाध्यमांनीही तेच करावं? रेडिओचं कोणतंही केंद्र वा दूरदर्शनची कोणतीही वाहिनी सकाळी पाच ते आठ वाजेपर्यंत अशा धर्मप्रदूषणालाच वाहून घेत असते, हे आपलं दुर्दैव!

सुप्रभातीच्या शांततेच्या ह्या सत्यानाशकारी उपद्रवाचं नाव मात्र आहे, मंगलप्रभात! जी प्रभात आजारी माणसांना विश्रांती घेऊ देत नाही, अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना शांतता लाभू देत नाही, निरीश्वरवाद्यांना देववेड्या भक्तिगीतांचे कडू डोस जबरदस्तीने पाजल्याशिवाय राहात नाही, ती प्रभातवेळ मंगल कशी असू शकेल? भारतात फक्त हिंदूच राहातात आणि ते झाडून सर्व धार्मिक, श्रद्धाळू आहेत, असं गृहीत धरूनच जर प्रसारमाध्यमं कार्यरत असतील, तर सामाजिक प्रक्षोभ वाढणारच. ह्या धर्मांधता जोपासनेमागे राष्ट्रांधता निर्मितीचा कुटिलपणाचा डाव आहे, असं इतर धर्मीयांनी का म्हणू नये? तालिबानी अतिरेकी शिक्षणकेंद्र उद्ध्वस्त करतात आणि मंगलप्रभातवाले विद्यार्थ्यांच्या शांततेला सुरुंग लावतात, हे दोन्ही प्रकार अतिरेकीपणातूनच जन्म घेतात. प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'स्पीकरवरची पहाटेची आरती आणि नमाज झोपेतून उठण्यापूर्वीच कानांवर आदळतात. अशा उपासनेची गरज असते का? जगात एवढा गोंगाट-गलका असताना देवाच्या नावाने आरडाओरडा हवा कशाला?'

'पहाटेचा प्रहर हा दिवसाचा पाया आहे, उल्हसित वृत्तीचं ते उगमस्थान आहे. मनन- चिंतनाचं नवस्फुरण पहाटेच्या शांततेत साधतं. अशा शांतवेळी इंद्रियसंस्कार - प्रदूषण घडू नये, अस्वाभाविक अप्रिय श्रवण चित्तक्षोभाचं, धर्मकलहाचं कारण होऊन राष्ट्रहिताला तडे जाऊ नयेत, ही अपेक्षा योग्य आहे. तिची उपेक्षा केली जाऊ नये, 'हा प्राचार्य शिवाजीराव भोसलेंचा विचार आचरणात आणण्यासाठी म्हणावं लागतं-

पहाटेच्या वेळी । म्हणू नका राम
नियोजित काम । ध्यानी घ्यावे ॥ १
राम राम जागी। काम काम म्हणा
सुख कष्टाविना । लाभेल का ?`२
नियोजन करा । पहाटे कामाचे
गणित वेळेचे । श्रेष्ठ आहे ॥ ३
सूर्यास्तापर्यंत । राबतो शहाणा
सुसह्य जीवना । करीतसे ॥४
रामनाम घ्यावे । ऐदीऐतोबांनी
निर्लज्ज होवोनी । जगणारे ॥५
आरत्या भूपाळ्या । भाकरी न देती
उपाशी झोपती । वेडे भक्त ॥ ६
भक्तिगीते पुरे। झाली या देशात
आता श्रमगीत। गाऊ लागा ॥७
सुख हाच स्वर्ग आहे कष्टसाध्य
अन्य ते आराध्य । भुक्कडचि ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

प्रबोधन

# अमंगळ चंगळवाद !

चंगळवाद हा शब्द जरी अलीकडचा असला, तरी तो काही आई-बापाशिवाय जन्मलेला नाही. चैन ही त्याची आई आणि विलास हा त्याचा बाप आहे. हे कुटुंब पिढीजात धनाढ्य आणि खानदानी आहे. सोनं-रत्नं, गाद्या- गिर्धा, समृद्ध निवासस्थानं, किमती गाड्या, यांच्या सौख्यदायी गराड्यात चंगळवाद वावरत असतो. भूतकाळाची भुतं सामान्य लोकांना पछाडून टाकीत असतात, पण धनाढ्यांच्या जवळ फिरकण्याची हिंमत त्यांना होत नाही. भविष्यकाळाचं मृगजळ सामान्यांना धावायला लावून त्यांची दमछाक करीत असतं. पण चंगळवाद्यांना खऱ्या पाण्याचं शुद्ध पाणी, सुंगधी पाणी, पोहण्याच्या तलावातील निर्जंतुक स्वच्छ पाणी असे अनेक प्रकार उपलब्ध असल्याने मृगजळासाठी हैराण व्हायची गरज नसतेच.

मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या प्रस्थापनेनंतरच प्रस्थापितांच्याकडे लोक चिकित्सक नजरेने पाहू लागले. तोपर्यंत या श्रीमंत लोकांना जनता हरीचे लाल अर्थात देवानाम प्रिय असं म्हणत होती. कारण श्रीमंतांकडे कुणी वाकड्या किंवा वाईट नजरेने पाहू नये, अशी व्यवस्था धमार्ने कर्मफलसिद्धान्त मांडून केली होती. ह्या कर्मफलसिद्धान्ताचा लोकांच्या ब्रेनवॉशिंगसाठी फारच चांगला उपयोग झाला. श्रीमंत टिकले तरच आपण जगणार, असा हा धमार्चार्यांचा सरळ, स्वार्थी विचार यामागे होता. यज्ञ-याग, व्रत-वैकल्यं करून दान- दक्षिणा श्रीमंतच देतो. ह्या हेतूनेच कर्मफलसिद्धान्त प्रस्थापित करण्यात आला, असं म्हणण्यास भरपूर वाव आहे. ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी असा पोटभरूपणा या कर्मफलसिद्धान्ताच्या स्थापनेमागे होता.

श्रीमंतांना समाजाच्या चांगल्या किंवा वाईट नजरेची फारशी फिकीर नसते. चंगळवादाच्या नशेत ते रात्रंदिवस बुडालेले असतात. आपणाकडे असलेल्या अमाप संपत्तीचा उपयोग ते अधिक चैनीसाठी करण्यात दंग असतात. हर्षद मेहताकडे जवळजवळ ३० परदेशी बनावटीच्या आलिशान गाड्या होत्या. स्टॅम्प घोटाळ्याचा जनक तेलगी बारबालांवर एका रात्रीत १०-२० लाख उडवीत होता. असे बरेच धनाढ्य बहाद्दर आहेत की, ते जातील तिथे एका गृहदेवतेची स्थापना करून तिच्यापोटी संतती निर्माण करीत असतात. जॅकेलिन केनेडीच्या चंगळवादाने उद्योगपती ओनॅसिस त्रस्त झाले होते. एलिझाबेथ टेलरने कामक्षेत्रातील चंगळवादाचं उदाहरण जगापुढे ठेवलं. जनानखाना बाळगणं हा चंगळवाद पूर्वी होता. आज मद्यविक्रीत भरमसाठ पैसा कमावलेले उद्योगपती मैत्रिणींचा ताफा बाळगताना जाहिरातीमधूनसुद्धा दिसत असतात. भुकेला कोंडा निजेला धोंडा असं वर्तन संन्याशाचं असलं पाहिजे. पण आपले बोके संन्याशी ६०-७० (की १००) किलो सोनं वापरलेल्या पलंगावर ऐश करताना दिसतात. कारण ते चंगळवादी असतात. श्रीमंतांचं चंगळवादी वर्तन हे मानव- समाजाच्या विद्रूप, भयानक चेहऱ्याचं भयानक दर्शन असतं. चंगळवादावर निर्बंध आणण्याचं थोर कार्य पतनपूर्व रशियात झालं. माओच्या काळातील चीनमध्ये झालं आणि भारतात महात्मा गांधी यांच्या नैतिक दबावामुळे त्यांच्या जीवनकाळातच झालं. वास्तविक चंगळवादावर कडक निर्बंध आणून तो पोसलाच जाणार नाही, असं करणं राजसत्तेला अवघड नसतं. पण भारतासारख्या लोकशाहीत कशाचंच काही धड नसल्याने तसे निर्बंध येथे येण्याची सुतराम शक्यता नाही.

असं सांगतात की, हैद्राबादच्या नबाबाकडे अमाप संपत्तीने भरलेलं तळघर होतं. पण ते आपली जीर्ण शेरवाणी शिवून, ठिगळं लावून घालीत. छत्रपती शाहू महाराज अतिशय साधेपणाने जगत. जाडाभरडा खाकी कोट, सुती शर्ट-विजार, साधं मुंडासं आणि खायला कांदा, दही-भाकर असा त्यांचा आचार असे. त्यांचा लहान मुलगा शिवाजी अपघातात मरण पावल्यावर तर महाराज एक अंगरखा, लुंगी अशा फकिरी वेशात उदासपणे जगू लागले. निजण्यासाठी दगडीपार म्हणजे निजेला धोंडाच होता. महात्माजींचं अनुकरण केल्यामुळे घनश्यामदास बिर्ला आणि नेहरू कुटुंबियांनी चंगळवादाचं विसर्जनच केलं होतं.

हे आदर्श आपणही बाळगू शकतो. संपत्तीचा उपयोग बिल गेट्सप्रमाणे लोकहितार्थ करू शकतो. ही जाणीव, हा संस्कार मानवाला श्रेष्ठ पातळीवर नेणारा आहे. चंगळवाद्यांनी निदान आपल्या सुखलोलुपतेचं नग्न दर्शन तरी जगाला घडवू नये, एवढीच अपेक्षा. कारण-

चंगळवाद हा । अमंगळवाद
नाही अपवाद । नियमाला ॥१
जाणीव न ज्याला। माणूसपणाची
चंगळवादाची। शिकार तो ॥२
उपभोग हवा। संतोषकारक
तृष्णेचा वर्धक । अनिष्ट तो ॥३
'भोगाच्या गतीला । ब्रेक संयमाचा'
मंत्र हा सुखाचा। सर्वांसाठी ॥४
पोटफुटी होई । इतके न खावे
खाण्याचे न व्हावे । खाणे स्वतः ॥५
मनाला सुख द्या। नीती शिकवून
अनीतीने प्राण । कष्टी व्हावे ॥६
बाळ हावरट । करिते अनर्थ
कष्टी मायतात । खूप होती ॥७
चंगळवादीही । तसे कष्ट देती
दीन कष्टी होती । दर्शनाने ॥८
सुखे भोगताना । गरिबा जो स्मरे
तोच वीर। बरे मनोजयी ॥ १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सिव्हील हॉस्पिटल येथे..

दि. २७/०९/२०२४ रोजी अधिष्ठाता संजीव ठाकूर यांच्याकडे समक्ष भेटून शिष्टमंडळाद्वारे निवेदन दिले होते.

यावेळी अधिष्ठाता संजीव ठाकूर यांनी १५ दिवसात चौकशी अहवाल देण्यात येईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले होते आज ६ महिने झाले अद्याप कोणतीही चौकशी अहवाल अथवा साधे पत्रव्यवहार देखील सिव्हील हॉस्पिटल यांचेकडून झालेले नाही.

तात्काळ कारवाई करावी व संघटनेस अहवाल प्राप्त व्हावा यासाठी स्मरणपत्र देवून देखील काही हलचाल न झाल्याने दि. १८/०२/२०२५ रोजी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण वच आयुष्य द्रव्य विभाग मुंबई व संचालक वैद्यकीय शिक्षण संचालनालय मुंबई, हसन मुश्रीफ, मुख्य कार्यकारी अधिकारी महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना वरळी यांच्याकडे निवेदन दिल्यावर या निवेदनात आपण कारवाई करणार नसाल तर संघटनेच्यावतीने दि २०/०२/२०२४ रोजी बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा दिलेला होता.

यावर तात्काळ वैद्यकीय शिक्षण व आयुष्य विभाग यांच्या कार्यालयाकडून दि. २०/०२/२०२५ रोजी अधिष्ठाता श्री छपत्रती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर यांना चौकशीकरिता आदेश दिलेले असून त्या आदेशान्वये आपले आंदोलन करण्यात येवू नये यासाठी दि २८/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये आंदोलन तुर्तास स्थगित करण्यात आलेले आहे याउपर तात्काळ अधिष्ठाता सोलापूर यांनी संबंधित दोषी लॅबधारक व वैद्यकीय समन्वयक श्रीमती शशिकला जगताप व संबंधित डॉक्टर व कर्मचारी यांचेवर कारवाई न झाल्यास अधिवेशन काळात मुंबई मंत्रालय येथे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संत रोहिदास सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल व्हनमारे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. या पत्रकार परिषदेस हरिभाऊ वाघमारे, श्रीनिवास धुळगुंडे, सोपान थोरात, चैतन्य व घोडके, प्रभाकर शिंदे आदि उपस्थित होते.

# बनावट आधार कार्डद्वारे सोलापुरात राहणाऱ्या...

**बनावट कागदपत्र कशी आणि कुठून मिळवली ? याचा तपास सुरु**

दरम्यान, या सर्व लोकांना पोलिसांनी अटक केली असून त्यांना आज न्यायालयात हजर केलं जाणार असल्याची माहिती सोलापूर पोलीस आयुक्तांनी दिली आहे. शिवाय सोलापुरात राहण्यासाठी त्यांना कोणी मदत केली? त्यांनी बनावट कागदपत्र कशी आणि कुठून मिळवली? याचा तपास देखील सुरु असल्याची माहिती पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी दिली आहे.

**भारतात अवैद्य मार्गाने घुसखोरी**

भारतात अवैद्य मार्गाने घुसखोरी करून बनावट आधार कार्ड बनवून सोलापूर शहरात वास्तव्य करत असलेल्या बारा बांगलादेशींना एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतले आहे. श्री जगंदबा महिला रेडीमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औदयोगिक संस्था मर्या सोलापूर, अंध व अंपग कार्यरत असणारी सहकारी औदयोगिक संस्था प्लॉट नं 20/2 ई आर टी चौक एमआयडीसी रोड सोलापूर या ठिकाणी 5 मार्च रोजी हे बांगलादेशी पोलिसांना सापडले आहेत.नासीर सरकार मो. बदी उज्जमान वय-२२ वर्षे, रा- ग्राम तैगोरिया भाग राजशाही जि नाटोर बांग्लादेश २) मोहम्मद नजीरउल्ला इस्लाम वय-३० वर्षे रा- कौदमपल्ली जि भोगुर बांग्लादेश ३) मोहम्मद मिजानूर रोहमन, वय-२६ वर्षे, रा- नेत्रकोना बांग्लादेश ४) बाबुमिया सुलतान वय-२५ वर्षे, रा- कोदंलपुर गोसाई राहत शरियतपुर बांग्लादेश ५) शफिक रशिद मोडंल वय-३१ वर्षे, रा-ढाका बांग्लादेश ६) मोहम्मद रहुलआमीन खलील फोराजी वय-३३ वर्षे, रा-परगना पश्चिम बंगाल रावगा बांग्लादेश ७) इम्रान नुरआलम हुसेन वय-२७वर्षे, रा- कोदंलपुर गोसाई राहत शरियतपुर बांग्लादेश ८) महमद हजरतअली पोलाश वय ३१ वर्षे, रा- ग्राम काजीबारा जि बोगुरगा राजशाही बांग्लादेश ९) महमद हजरतअली पोलाश वय ३१ वर्षे, रा- ग्राम नारहट्टा तथा तहालून जि बुगुरा बांग्लादेश १०) मोहम्मद सोहेल जाबेदअल्ली सरदार, वय-२२ वर्षे, रा- ढाका बांग्लादेश ११) अलाल नुरइस्लाम मियाँ वय-३५ वर्षे, रा- नॉर्थ परगना पश्चिम बंगाल १२) मोहम्मद अलीमीन हानिफ बेफिरी, वय-२९ वर्षे, रा- नॉर्थ परगना पश्चिम बंगाल देश बांग्लादेश अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या बांगलादेशींची नावे आहेत.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार भारत देशामध्ये कोणत्याही प्रकारच्या वैदय प्रवासी परवानगी, कागदपत्राशिवाय तसेच भारत-बांग्लादेश सीमेवरील मुलकी (नोदंणी) अधिकारी यांचे लेखी परवानगी शिवाय अवैध मार्गाने घुसखोरी करून भारत देशात प्रवेश करून बनावट भारतीय आधारकार्ड बनवून ते सोबत बाळगून सोलापूर शहरात वास्तव्य करीत असताना मिळून आले म्हणून वरील आरोपीताविरूध्द कायदेशीर फिर्याद दाखल आहे. या बांगलादेशी नागरिकांना सोलापुरात श्री जगदंबा औद्योगिक संस्थेमध्ये कुणी वास्तव्यास ठेवले होते, याचा तपास केला जात असून या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक खोमणे हे करीत आहेत.

# उजनी धरणातून शेतीसाठी...

विखे पाटील व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. बैठकीसाठी जिल्ह्यातील सर्वच आमदार, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता एच. टी. धुमाळ, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता एस. एस. खांडेकर, कार्यकारी अभियंता रावसाहेब मोरे, सोमशेखर हरसुरे, मोहन जाधवर, संभाजी माने, भीमा कालवा मंडळाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे, त्यांचे कार्यकारी अभियंता धनंजय कोंडेकर, नारायण जोशी उपस्थित होते. याशिवाय खासदार धैर्यशील मोहिते पाटील व प्रणिती शिंदे हेही बैठकीसाठी ऑनलाइन सहभागी झाले होते.

## वात्रटिका

### व्वा भैय्या व्वा

यानं यावं त्यानं यावं
आणि काही बोलावं...
शहाणं समजून स्वतःला
नाकानं कांदे सोलावं...
घाटकोपर मध्ये येऊन
कोपरखळी मारली...
गुजराती नाचवत त्याने
आमची मराठी चोरली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

पान १ वरून

# विविध मागण्यांसाठी सर्व...

परिषद कर्मचारी युनियन सोलापूर, दिव्यांग कर्मचारी संघटना

मराठा सेवा संघ जिल्हा परिषद सोलापूर, सिंचन कर्मचारी संघटना सोलापूर, सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना सोलापूर, महाराष्ट्र राज्य गृह विभाग कार्यालयीन कर्मचारी मध्यवर्ती संघटना सोलापूर, महाराष्ट्र राज्य कुष्ठरोग कर्मचारी संघटना सोलापूर कोषागार कर्मचारी संघटना सोलापूर, महसूल कर्मचारी संघटना सोलापूर, भूमी अभिलेख कर्मचारी संघटना, महाराष्ट्र स्टेट ऑडिट कर्मचारी संघटना नागपूर शाखा सोलापूर, भूजल सर्वेक्षण कर्मचारी संघ टना सोलापूर, मलेरिया कर्मचारी संघटना सोलापूर, परिवहन खाते कर्मचारी संघटना सोलापूर, जलसंधारण कर्मचारी संघटना सोलापूर ,महाराष्ट्र राज्य परिचारक कर्मचारी संघटना सोलापूर,वाहन चालक कर्मचारी संघटना सोलापूर,नोंदणी कार्यालय कर्मचारी संघटना सोलापूर, सहकार कार्यालय कर्मचारी संघटना सोलापूर, राज्य कामगार विमा रुग्णालय कर्मचारी संघटना सोलापूर, पशुसंवर्धन कर्मचारी संघटना सोलापूर, तलाठी कर्मचारी संघटना, राज्य विक्रीकर कर्मचारी संघटना, आरोग्य विभाग कर्मचारी संघटना, अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटना, रजिस्टर जन आरोग्य कर्मचारी संघटना सोलापूर, कनिष्ठ अभियंता संघटना सोलापूर शासकीय तंत्रनिकेतन संघटना सोलापूर, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटना सोलापूर, शिक्षक समिती सोलापूर, एम एस सी बी वर्क फेडरेशन, जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी संघटना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ या संघटनांचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी महसुली विभागाच्या जमदाडे सहकार खात्याचे अजय बचुटे सिव्हिल हॉस्पिटलचे नितीन कसबे शासकीय तंत्र विभागाचे विटकर महसुली विभागाचे रवी नष्टे जलसंपदा विभागाचे बापू शिंदे जिल्हा परिषद मराठा सेवा संघाचे अविनाश गोडसे कुष्ठरोग विभागाचे सोळुंके जलसंपदा विभागाचे मारेप्पा पंदीलोलू गृह विभागाचे दीपक पुजारी एम एस ई बी विभागाचे विलास कोले जिल्हा परिषद महासंघाचे सचिन मायनाळ कंत्राटी कर्मचारी संघटनेचे सचिन जाधव अखिल भारतीय सफाई कर्मचारी संघटनेचे बाली मंडेपू महानगरपालिका कामगार संघटना कृती समिती चे अशोक जानराव मागासवर्गीय शिक्षक कर्मचारी संघटनेचे शामराव जवंजाळ जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे डॉ शत्रुघ्न माने प्राथमिक शिक्षक संघटनेचे सुरेश पवार तसेच महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटनेचे माजी राज्य सरचिटणीस अशोक इंदापुरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले आंदोलनाचे सूत्रसंचालन शंतनू गायकवाड यांनी केले आभार प्रदर्शन राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष राजीव साळुंखे यांनी केले. सदर आंदोलन यशस्वी होण्यासाठी राज्य मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस अमृत कोकाटे अध्यक्ष राजीव साळुंखे, संघटक किशोर सावळे, उपाध्यक्ष शंतनू गायकवाड कोषाध्यक्ष नरेश बोनाकृती, कार्याध्यक्ष गजानन गायकवाड उपाध्यक्ष मंजुनाथ गायकवाड प्रसिद्धीप्रमुख विनायक पाटील सहसचिव दीपक पुजारी देविदास शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**जिल्हा परिषदेच्या प्रशासनास निवेदन**

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या वतीने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय (पूनमगेट) येथे दि.06 मार्च 2025 रोजी सकाळच्या सत्रात दोन तास धरणे सत्याग्रह करण्यात आले. सदर सत्याग्रहास म.रा.जि.प.कर्मचारी महासंघ जि.प.सोलापूर यांच्या वतीने सर्व जिल्हा व तालुकास्तरावरील जि.प.कर्मचारी सहभागी झाले होते. जुनी पेन्शन योजना लागू करणे, जि.प.कर्मचारी वेतनत्रुटी, कंत्राटी कर्मचारी यांना कायम करणे अशा प्रलंबित एकूण 17 मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सोलापूर यांना देण्यात आले. या प्रसंगी कर्मचारी महासंघाचे दिनेश बनसोडे, महाराष्ट्र राज्य कंत्राटी कर्मचारी संघटनेचे सचिन जाधव,लक्ष्मण गळगुंडे, सचिन मायनाळ, सचिन येडसे, इरफान कारंजे, महेश केंद्रे, राजश्री कांगरे, चेतन भोसले, मराठा सेवा संघाचे अविनाश गोडसे, सुर्यकांत मोहिते, दिव्यांग संघटनेचे लक्ष्मण वंजारी, मैल मजूर संघटनेचे कानिफनाथ चव्हाण, आरोग्य कर्मचारी युनियनचे विष्णू सानेपागूल, नर्सेस संघटनेचे सुरेखा जवळकर, जि.प.अभियंता संघटनेचे विरपक्ष जेऊरे, मुलाणी, मणुरे, संतोष जाधव, गणेश हुच्चे, संजय गौडगांव, विलास मसलकर, विशाल घोगरे, बालाजी बोरकर, चिन्मय घाडगे, आदलिंगे, कांबळे, स्वामी, उमाकांत कोळी, प्रमोद मोरे, रोहन भोसले, चंदू कोळी, उपस्थित होते. महिला प्रतिनिधी सुनिता भुसारे, रेणूका प्रथमशेटटी, आरती माढेकर, वैशाली शिंदे, राजश्री रोजी, पोरेडडी, एल.एम.शिंदे, कोळी आदि उपस्थित होते.

सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर, नगरपंचायत-नगरपरिषद कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने आज पुनम गेटवर " धरणे-सत्याग्रह" आंदोलन करणेत आले. मुख्यमंत्री स्तरावर प्रलंबित मागण्यासंदर्भात हे आंदोलन करणेत आले. शासनाने वरील लोकशाही पध्दतीने केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन सोबतच्या १७ प्रलंबित मागण्यांवर सत्वर ठोस निर्णय घ्यावेत. मागण्यांबाबत यापुढेही दिरंगाई होत राहिल्यास कर्मचारी-शिक्षकांना नाईलाजाने तीव्र संघर्ष करावा लागेल. हा संघर्ष टाळणे निश्चितच कर्मचारीभिमुख राज्य शासनाच्या हाती असल्याचे दिनेश बनसोडे यांनी सांगितलें.

**जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने आंदोलन**

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने देखील यावेळी आंदोलन करण्यात आले यावेळी महिला सचिव निर्मला राठोड, अनुपमा पडवळे विलास मसलकर, डॉ. विभागीय संघटक एस पी माने, श्रीशैल देशमुख हे यावेळी उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# वर्धा येथे राज्य ग्रंथालय संघाचे अधिवेशन

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे वार्षिक अधिवेशन राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली 59 वे अधिवेशन 15 व 16 मार्च रोजी सत्यनारायण बजाज जिल्हा वाचनालय वर्धा येथे होणार असल्याची माहिती राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष ग्रंथमित्र गुलाबराव पाटील यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली. अधिवेशनाचे उद्घाटन खा. अमर काळे व आ. विजय वडेट्टीवार, आ. अभिजित वंजारी आ. सुधाकर अडवाले या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे या अधिवेशनात ग्रंथालय अनुदान 40 टक्के वाढ, दर्जा बदल, नवीन ग्रंथालय मान्यता, इत्यादी समस्या सोडवणे व मार्गदर्शन करणेसाठी राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, मराठवाडा सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे नागपूर विभाग सहाय्यक ग्रंथालय संचालक रामदास साठे ,माहीती अधिकारी रवी गीते जिल्हा ग्रंथालय अधिकारी वर्धा नितिन सोनोने हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. विषय पत्रिकेनुसार कार्यक्रम होणार आहेत यावेळी ग्रंथमित्र राम मेकले कायार्पाध्यक्ष, ग्रंथमित्र सोपानराव पवार प्रमुखकार्यवाह भिमराव पाटील कोषाध्यक्ष, सुनिल कुबल स्थायी समिती सचिव, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ पदाधिकारी, व संचालक मंडळ अधिवेशन स्वागताध्यक्ष प्रदीपकुमार बजाज यांची उपस्थिती असणार आहे. सोलापूर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने ग्रंथालय कर्मचारी पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे मार्गदर्शक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, अध्यक्ष ग्रंथमित्र विजयकुमार पवार, उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, प्रमुखकार्यवाह साहेबराव शिंदे, सहसचिव अन्सर शेख, कोषाध्यक्ष प्रकाश शिंदे पुणे विभाग ग्रंथालय संचालक विनोद गायकवाड,शैलशिल्पा जाधव यांनी केले आहे.

# सारोळे पाझर तलाव भरून देण्याची आ. खरेंची मागणी - जलसंपदामंत्र्यांना निवेदन



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील सारोळे येथील पाझर तलाव भरून देण्याची मागणी आमदार राजू खरे यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे कालवा सल्लागार समितीच्या बैठकीदरम्यान केली.बुधवारी, उजनी कालवा सल्लागार समितीची बैठक जलसंपदामंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यावेळी मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे आ.राजू खरे यांनी आपल्या मतदारसंघातील पाणीप्रश्नाबाबत जलसंपदामंत्र्यांना निवेदन दिले आहे.आष्टी उपसा सिंचन योजनेतून सारोळे (ता. मोहोळ) या तलावात पाणी सोडून हा तलाव तातडीने भरून द्यावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली. उजनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पंढरपूर शहरासाठी पिण्याकरिता पाणी राखीव ठेवण्यात यावे. उजनी क्षेत्रातील पाणी उचलणाऱ्या सर्व साखर कारखान्यांकडून पाणीपट्टी सक्तीने वसूल करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या.

नदीकाठावरील सर्व नादुरूस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती करावी. त्यामुळे पाणी गळती कमी होईल, असेही सांगण्यात आले. या बैठकीला क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, पालकमंत्री जयकुमार गोरे, राजू खरे, अभिजित पाटील, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, दिलीप सोपल, नारायण पाटील, उत्तम जानकर, सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे, डॉ. बाबासाहेब देशमुख हे आमदार, धैर्यशील मोहिते-पाटील, प्रणिती शिंदे हे खासदार व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# बार्शी व वैराग येथील मराठा समाज बांधवांच्या वतीने मुंडे यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन




**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनामध्ये मंत्रिपदाचा राजीनामा दिलेले धनंजय मुंडे यांना मुख्य आरोपी करावे, यासह इतर मागण्यांसाठी बार्शी व वैराग येथील मराठा समाज बांधवांच्या वतीने बार्शी तहसील कार्यालयासमोर धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले. आंदोलनात आनंद काशीद, बालाजी डोईफोडे, एस. व्ही. कापसे, लक्ष्मण सुरवसे, बाबा हुंबे, आर. बी.ढेंगळे, भास्कर झालटे, सोमनाथ इंगळे, शंकर ठोंबरे, गणेश काटमोरे आदी उपस्थित होते. तहसीलदार संजीवन मुंडे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा खून धनंजय मुंडे यांच्या राजकीय वरदहस्ताने झाला आहे. तेच या खुनातील मुख्य सूत्रधार आहेत. यामुळे धनंजय मुंडे यांनाच सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनामध्ये मुख्य आरोपी करण्यात यावे. सरपंच देशमुख खून खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावा. सरपंच संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी यासह स्वारगेट बस स्थानकामधील बलात्कार प्रकरणामूळे राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा.

# सहकार महर्षि साखर कारखान्यामध्ये औद्योगिक सुरक्षितता सप्ताहाचे आयोजन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये औद्योगिक सुरक्षितता सप्ताह दि. 4 मार्च 2025 ते 11 मार्च 2025 या कालावधीमध्ये आयोजन करण्यात आलेल असून सदर औद्योगिक सुरक्षितता सप्ताहाचे उदघाटन शुक्रवार दि. 4 मार्च 2025 रोजी सुरक्षितता दिनी सकाळी 10.00 वाजता कारखान्याचे इन्चार्ज शेतकी अधिकारी आर.एस.चव्हाण यांचे शुभहस्ते संपन्न झाले.

सदर प्रसंगी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष सहकार महर्षि शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील व आक्कासाहेब यांचे प्रतिमेचे पूजन करणेत येऊन, सुरक्षितता सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले अधिकारी, कर्मचारी यांना डेप्युटी चिफ इंजिनिअर-एस.पी.पताळे यांनी एकत्रितपणे सुरक्षिततेची शपथ दिली.

कारखान्याचे मार्गदर्शक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व चेअरमन जयसिंह मोहिते-पाटीलसाहेब यांचे कुशल नेतृत्वाखाली कारखाना प्रगतिपथावर कार्यरत असून कारखान्याने राज्यपातळीवर व देशपातळीवरील विविध पुरस्कार मिळवणारा कारखाना म्हणून ख्याती मिळविलेली आहे.

त्यानंतर सेफ्टी ऑफिसर पी.बी. रणनवरे यांनी कामगारांनी काम करताना काय व कशी दक्षता घ्यावी, कामगाराचे हित व कारखान्याचे हित कसे जोपासावे, विविध विभागातील अडचणींबाबत मार्गदर्शन करून सुरक्षितता विभागामार्फत कामगारांना दिलेली सुरक्षा साधने याचा कसा वापर करावा याबाबतच्या मार्गदर्शन केले. त्यावेळी सुरक्षितताबाबतच्या व्हिडिओ फिल्म दाखवुन कामगारांना माहिती देण्यात आली.

त्यानंतर कारखान्याचे चिफ इंजिनिअर व फॅक्टरी मॅनेजर एस. के.गोडसे यांनी कारखान्यामध्ये काम करत असताना कामगारांनी सुरक्षितता साधनांचा वापर करुन कोणत्याही प्रकारचा अपघात होणार नाही याची दक्षता घेणे बाबत आवाहन केले व सदर कालावधीमध्ये फायर ट्रेनिंग, पर्यावरण व औद्योगिक सुरक्षिततेबाबतची माहिती दिली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यावेळी उपस्थित कारखान्याचे अधिकारी यांचे शुभहस्ते निबंध, चारोळी व घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरण केले. निबंध लेखन प्रथम क्रमांक जे.पी. साठे (को-जन), द्वितीय आर.टी. दौलतोडे (इंजिनिअरींग), तृतीय पी.के.पवार (टाईम ऑफिस), चारोळी लेखन प्रथम क्रमांक एस.आर.कुंभार (शेती), द्वितीय व्ही.पी.कुंभार (परचेस), तृतीय डी.एस.चव्हाण (डिस्टीलरी) तसेच घोषवाक्य लेखन प्रथम क्रमांक एस.जी.दोशी (ॲसिड), द्वितीय व्ही.आर.दुरणे (परचेस), तृतीय व्ही.एच.वाघ (ॲसिड) यांना प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सन्मानित करणेत आले.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे कार्यलक्षी संचालक-आर.डी. रणनवरे, परचेस ऑफिसर-आर. एस.गायकवाड, लेबर ॲन्ड वेलफेअर ऑफिसर एस.एम. साळुंखे, हेड टाईम किपर- व्ही. आर.वाघ, पर्यावरण अधिकारी- पी.एच.इनामदार, इन्चार्ज कॉम्प्युटर प्रोग्रॅमर एस.जी.नरसाळे, सिक्युरिटी ऑफिसर एन.सी.निंबाळकर व कारखान्याचे सर्व कामगार तसेच युनियन प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व सुत्रसंचालन गजानन पिसे यांनी केले.

# सांगोला नगरपरिषदेमार्फत महिला दिनानिमित्त होम मिनिस्टर कार्यक्रम

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा ५.० अभियानांतर्गत ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सांगोला नगरपरिषदेमार्फत विविध स्पर्धा, कार्यशाळा व प्रशिक्षण तसेच 'होममिनिस्टर - खेळ पैठणीचा' यासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी सांगितले. वरील दोन्ही स्पधेर्तील प्रत्येकी पहिल्या तीन क्रमांकांना रक्कम रुपये ५ हजार, ३ हजार, २ हजार व उत्तेजनार्थ बक्षीसही दिले जाणार आहेत. ७ मार्च रोजी केमिकल फ्री फ्रुट पल्प प्रिझर्वेशन व फ्लोरल ड्रिंक (फुलांचे सरबत) या विषयावरती प्रशिक्षण व कार्यशाळा तर ८ मार्च २०२५ रोजी होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा, लकी ड्रॉ व बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. वरील सर्व कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे होणार असून सांगोला ६ मार्च रोजी पाककला, रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. शहरातील महिलांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोलापूर बाजार समितीच्या प्रशासकपदी प्रगती बागल यांची नियुक्ती मोहन निंबाळकर यांना हटविले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकपदावरून मोहन निंबाळकर यांना हटवून त्यांच्या ठिकाणी सहकारी संस्थेच्या सोलापूर शहर उपनिबंधक डॉ. प्रगती बागल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निंबाळकर यांच्याबद्दल अनेक गंभीर तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांना या पदावरून कार्यमुक्त करण्यात आल्याचा आदेश पणन विभागाचे उपसचिव संतोष देशमुख यांनी काढला आहे. सोलापूर बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर राज्य सरकारने दोनवेळा मुदतवाढ दिली होती. राज्य विधानसभा निवडणुकीच्या अगोदर बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया राज्य निवडणूक प्राधिकरणाने सुरू केली होती. परंतु, विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होताच बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया आहे त्याच स्थितीत थांबविण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीनंतर बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया पुढे सुरू होईल, असे इच्छुकांना वाटत असतानाच प्रशासक मोहन निंबाळकर यांनी कायद्यातील पळवाटा शोधून नव्याने मतदार यादी करण्यासंबंधीचा प्रस्ताव पणन संचालकांना सुचविला होता. त्यामुळे चालू असलेली निवडणूक प्रक्रिया रद्द झाली होती. शिवाय निंबाळकर यांनी बाजार समितीच्या कारभारात मनमानीपणे आर्थिक निर्णय घेतल्याचा त्यांच्यावर आरोप झाला होता. त्याबद्दल त्यांच्याविरोधात अनेक तक्रारी करण्यात आल्या होत्या. अखेर त्या तक्रारींची दखल घेत निंबाळकर यांना प्रशासकपदावरून कार्यमुक्त करून बाजार समितीची जबाबदारी सहकारी संस्थेच्या सोलापूर शहर उपनिबंधक प्रगती बागल यांच्याकडे सोपविण्याचा आदेश पणन विभागाचे उपसचिव संतोष देशमुख यांनी बुधवारी तातडीने काढला आहे. बागल यांच्याकडे बाजार समितीची अतिरिक्त जबाबदार राहील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# वडाचीवाडी शाळेतील परसबाग जिल्ह्यात तृतीय



**माढा (कटूसत्य वृत्त):-** प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत सन 2024 -25 या सालातील शालेय परसबाग स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडाचीवाडी (अं.उ) केंद्र -दारफळ तालुका माढा या शाळेने माढा तालुक्यात प्रथम क्रमांक व सोलापूर जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळवून दुहेरी यश मिळवलेले आहे.

शाळा हाच मळा चला फुलवूया शाळा अन घडवूया बाळा या भूमिकेतून गुणवत्ता वाढीबरोबरच सातत्याने पालेभाज्या फळभाज्या फळझाडे फुलझाडे आणि वृक्ष संवर्धन करण्यासाठी या शाळेतील बालमित्र शिक्षक बांधव शाळा व्यवस्थापन समिती महिला बचत गट गावातील सर्व पदाधिकारी मंडळी यांनी मोलाचे योगदान देऊन शाळेला हरित शाळेचे रूप दिलेले आहे.

या शाळेतील परसबागेत टोमॅटो वांगी बटाटे मिरची कांदा पालक चुका शेपू मेथी भोपळा दोडका मुळा बडीशोप आले आळू लसुन कोथिंबीर इत्यादी भाज्या व औषधी वनस्पतींची लागवड केलेली आहे.

तसेच लालबहादूर शास्त्री फलोद्यानात 101 फळझाडांच्या लागवडीसह शाळेने विविध जातीचे 250 वृक्ष संवर्धन केलेले आहे. माढा तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल 7500 रु. व जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल 7500 रु.असे एकूण 15000 रुपयांचे प्रोत्साहनात्मक पारितोषिक या शाळेला मिळणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील परसबाग स्पर्धेत क्रमांक मिळवलेल्या शाळांची यादी आज सोलापूर जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी जाहीर केली. वडाचीवाडी सारख्या केवळ ३० पट असलेल्या खूप छोट्या व द्विशिक्षकी शाळेने तालुक्यात प्रथम व जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल माढा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव, विस्तार अधिकारी दिगंबर काळे, केंद्रप्रमुख फारुख शेख यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात शिवजयंती निमित्त निबंध स्पर्धा संपन्न



**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत शिव जन्मोत्सव २०२५ निमित्त दिनांक १३ फेब्रुवारी रोजी निबंध स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांकरिता छत्रपती शिवाजी महाराज - द मॅनेजमेंट गुरु, एकविसाव्या शतकातील राजमाता जिजाऊ, ई-कचरा, डिजीटल युग - कृषितंत्रज्ञान, आयुर्वेद आणि आजचा तरुण, सांस्कृतिक वारसा आणि आजची पिढी, राष्ट्रशक्ती युवाशक्ती इत्यादी अनेकविध विषय देण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील एकूण ४० विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये मीनल कस्तुरे, प्राजक्ता व्यवहारे आणि गायत्री जाधव या विद्यार्थिनींनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेच्या आयोजन व संपन्नतेकरिता कृषीविद्या विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. मिनाक्षी नाईकनवरे यांनी परिश्रम घेतले. सदरील निबंध स्पधेर्साठी परीक्षक म्हणून सुजाता चौगुले आणि नम्रता गोरे यांनी काम पाहिले. लोकमंगल कृषी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धांचे आयोजन नियमित स्वरूपात करण्यात येते. सदरील स्पर्धेच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# करमाळा बंदला नागरिकांचा 100% प्रतिसाद



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अत्यंत अमानुषपणे झालेल्या हत्येच्या निषेधार्थ व धनंजय मुंडेला मुख्य सूत्रधार करून गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी सकल मराठा समाज करमाळाच्या वतीने दि. ०६ मार्च रोजी करमाळा बंदची हाक देण्यात आली होती, या बंदला नागरिकांनी प्रतिसाद देत १०० टक्के करमाळा शहर व तालुका बंद पाळून निषेध व्यक्त केला.

यावेळी सकल मराठा समाज करमाळाच्या वतीने सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येतील मास्टरमाईड वाल्मिक कराड व धनंजय मुंडे यांना मुख्य सूत्रधार आरोपी करण्यात यावे तसेच संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींना भर चौकामध्ये फाशीची शिक्षा देण्यात यावी व आरोपींचे व्हिडिओ, फोटो कोर्टात आरोप पत्रात दाखल केलेले आहेत हाच ठोस पुरावा आहे आणि संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचा फोटो, व्हिडिओ जे कोणाला पाठवले आहेत त्या सर्वांना आरोपी करण्यात यावे. तसेच संतोष देशमुख यांना मारहाण करत असताना देशमुख यांनी पाणी मागितल्यानंतर ज्या आरोपींनी त्यांच्यावर लघुशंका केली त्या आरोपीचे गुप्तांग काढण्यात यावे या सर्व मागण्या महाराष्ट्र शासनाने कोणालाही पाठीशी न घालता पूर्ण कराव्यात असे निवेदन करमाळा तहसीलचे नायब तहसीलदार लोकरे यांना देण्यात आले.

यावेळी बाळासाहेब गोरे, सुनिल सावंत, ॲड. नवनाथ राखुंडे, संजय घोरपडे, बबन चांदगुडे, दत्तात्रय काटकर तसेच रईस शेख, मुस्तकीम पठाण यांनी स्व. संतोष देशमुख यांच्या झालेल्या निर्घृण हत्येचा निषेध व्यक्त करत आरोपीना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे असे मत यावेळी व्यक्त केले. यावेळी सकल मराठा समाज करमाळा व बहुजन समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलेच्या निर्घृण हत्याप्रकरणी तीन आरोपींना सेशन कोर्ट बार्शी यांनी सुनावली जन्मठेपेची शिक्षा

















सरकारी वकील

**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील टेंभुर्णी पंढरपूर रोडवर असलेले अकोले (बु) येथील आरोपी नामे आगतराव काळे याचा मुलगा अपघातात मयत झाला होता. मुलाची बायको कोमलला तिची आई लक्ष्मी गोकुळ पवार हिला तिची नणंद कीतीर्मालाला, प्रीती उर्फ गुड्डी, सासू विमल भेटून देत नव्हती.

दिनांक 30-1-2021 रोजी सायंकाळी 6-00 वाजण्याचे सुमारास लक्ष्मी हीस मुलगी कोमल हिची भेट घालून देते म्हणून कीतीर्माला, प्रीती यांनी बोलावून घेऊन तिच्याकडून 5000 रुपये घेऊन तिचा मयत भाऊ सोमनाथ अगतराव काळे याच्यावर लक्ष्मी हिने करणी केल्याचा राग मनात धरून कीतीर्माला, प्रीती उर्फ गुड्डी, प्रीतीचा मित्र रॉकी उर्फ अक्षय उर्फ आकाश अशोक भालेराव, आगतराव काळे, विमल काळे या सर्वांनी कट रचून, मयत लक्ष्मी हिचा कोयता, सुरा, लोखंडी कुऱ्हाड या हत्यारांनी वरील आरोपींनी लक्ष्मीचे सू-याने नरडे कापले, हाताचे कोपऱ्यावर, पायाचे घोट्याजवळ, नडगीवर पिंडरीवर मांडीवर वार केले व सर्वांनी मिळून तिचा खून करून साडीस दगडे बांधून तिचे प्रेत विहिरीतील पाण्यात टाकून देऊन पुरावा नष्ट केला.

वरील आरोपी विरुद्ध मयताची बहीण हिने टेंभूर्णी पोलीस ठाणेस गु. र.नं 50/2021 अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री राजकुमार केंद्रे यांनी करुन आरोपीविरुद्ध सबळ पुरावा गोळा करून मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

सरकार पक्षाच्या वतीने सदर गुन्हा शाबितीसाठी 14 साक्षीदार तपासण्यात आले.

यातील फियार्दी व साक्षीदार करण भोसले, पो.कॉ. तुकाराम माने देशमुख यांची साक्ष, तसेच तपासी अंमलदार Dysp श्री राजकुमार केंद्रे यांनी तपासा दरम्यान गोळा केलेले पुरावे, परिस्थितीजन्य पुरावा, मृतदेह विहिरीमध्ये टाकून दिलेला कीतीर्मालाने दाखवणे त्याच्या आधारे साक्षीदार यांची साक्ष, प्रत्यक्ष दर्शी साक्षीदार नव्हता तरीही परिस्थितीत जन्य पुराव्याच्या आधारे संपूर्ण गुन्ह्याची एकेक कडी ही सरकारी वकिल श्री दिनेश देशमुख यांनी मा न्यायालयासमोर मांडले.

सरकारी पक्षाचा पुरावा याचा विचार करता मा.जिल्हा न्यायाधीश श्री. व्हि के मांडे साहेब यांनी आरोपी 1) कीतीर्माला आगतराव काळे वय 25 वर्षे, 2) आगतराव लक्ष्मण काळे वय 73 वर्षे, दोघे रा. अकोले बुद्रुक ता. माढा, 3) आकाश उर्फ अक्षय उर्फ रॉकी अशोक भालेकर वय 25 वर्षे रा. मांजरी ता.जि.लातूर यांना कोटार्ने दोषी ठरवून भा.द.वि. कलम 302 अन्वये जन्मठेप व प्रत्येकी 3000/- रुपये दंड, भा.द.वि. कलम 120(ब) अन्वये 14 वर्ष शिक्षा व प्रत्येकी 2000/- रुपये दंड, भा.द.वि. कलम 201 अन्वये 3 वर्ष शिक्षा व प्रत्येकी 1000/- रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

आरोपी क्रमांक 4 यांना सबळ पुराव्या अभावी निर्दोष सोडण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा तपास Dysp श्री राजकुमार केंद्रे तत्कालीन पोलीस निरीक्षक व त्यांचे दप्तरी श्रेणी पोलीस उपनिरीक्षक अशोक बाबर यांनी केला आहे..

सरकार पक्षा तर्फे श्री दिनेश देशमुख यांनी काम पाहीले. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार अमृत खेडकर यांनी काम पाहिले.

सदर केसमध्ये मा. श्री अजित पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा व मा. श्री दिपक पाटील पोलीस निरीक्षक टेंभुर्णी पोलीस ठाणे यांनी फियार्दी व साक्षीदार यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

# आर्या कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा



**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ निमगांव (टें), संचलित आर्या कॉलेज ऑफ फार्मसी टेंभुर्णी मध्ये क्रिडा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. क्रिडा सप्ताहात क्रिकेट, हॉलिबॉल, बॅडमिंटन, चेस, खो-खो, थ्रो-बॉल, कबड्डी, रांगोळी आदि स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये डि.फार्मसी प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पधेर्साठी महाविद्यालयाचे प्राचार्य धनंजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले असून शैक्षणिक ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांच्या क्रिडा कौशल्यांना प्राधान्य दिले जात आहे.यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.